**दिनांक: 1/३/२४**
**विषय: संस्थेच्या पुनर्निर्माण प्रोजेक्ट ची वाटचाल.**

बरेच दिवसात ह्या विषयावर आपल्या सभासदांशी काही हितगुज झाले नाही तरी ह्या प्रोजेक्ट वर आपली पंच समिती आणि बिल्डर सतत कार्यरत आहेत.
आपण 8 मार्च 24 ची तारीख समोर ठेऊन सगळी वाटचाल करीत होतो पण मागील दोन महिन्यात काही नवीन अडथळे (विषय) समोर आले ज्यावर दुर्देवाने पहिले विचार झाला नव्हता.

1. सरकार ने काही अटि / शर्तिन वर आपल्याला पत्रकार नगर ची जागा दिली होती. ह्यात 3 शरतींचा भंग झाल्याचे सरकारी पत्र आपल्याला जानेवारी च्या मध्यात मिळाले. त्यात आपल्या सोसायटीतील 13 सभासदांनी इथे फ्लॅट घेतांना कलेक्टर ची संमती घेतली नाही. असेच 5 फ्लॅट्स गिफ्ट रुपात संमती न घेता देण्यात आले.

2. सरकार ने आपल्याला 100 फ्लॅट्स ची परवानगी दिली होती पण आपण प्रत्यक्षात 90 फ्लॅट्स आणि 12 डुप्लेक्स बांधले आणि ते regularise पण केले नाहीत.

3. आपण समाज मंदिरा चा उपयोग कमर्शिअल कामा करिता केला.
सध्या पंच समिती / कन्सल्टंट आणि बिल्डर ह्याच तिन्ही प्रश्नां च्या सोलूशन्स वर काम करीत आहोत. 18 सभासदांचा विषय
येत्या 3/4 दिवसात पूर्ण होईल अशी आशा आहे. इतर दोन विषय ही लवकरच तडीस नेण्यात येतील.
8/3/24 ह्या तारखे आधी आपली ॲप्लिकेशन कलेक्टर् कडे in word झालेली असेल.
लोकसभे ची निवडणूक आल्या ने पुढील प्रक्रिया काही महिने लांबेल अशी शंका आहे मात्र आपल्या प्रोजेक्ट ला त्या मुळे काही समस्या होईल असे मुळीच नाही.
वरील सरकारी कामं चालत असतानाच, नवीन होणाऱ्या इमारती मधे आपण फ्लॅट्स च्या संबंधात ज्या सूचना केल्या आहेत, त्यांना अनसरून बिल्डर काही डिझाईन 3 मार्च ला सभासदांना दाखविणार आहेत.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती साठी**